# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३८८/प्रनिप्रा/१६ एप्रिल/२०२५/५३५ दिनांक : 28 APR 2025

**:: ९९व्या बैठकीचे इतिवृत्त ::**

**श्री. समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से. (से.नि.), अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार, दिनांक १६ एप्रिल, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **९९व्या बैठकीचे इतिवृत्त**,-

सदरील बैठकीस प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे) व २) श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या ऐवजी डॉ. सुनिल सु. भामरे, सह संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई निमंत्रित म्हणुन, २) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. यांच्या ऐवजी डॉ. रुपेश राऊत, सह संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, मुंबई हे निमंत्रित म्हणुन उपस्थित होते.

श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे हे अनुपस्थित होते. याबाबत नोंद घेण्यात आली.

**विषय क्रमांक १ : प्राधिकरणाच्या दिनांक २०/०१/२०२५ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त मंजुर करण्याबाबत.**

प्राधिकरणाच्या दिनांक २०/०१/२०२५ रोजी झालेल्या बैठकींचे इतिवृत्त प्राधिकरणाच्या मान. सदस्य यांना पाठवून त्यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. या संदर्भात इतिवृत्तांच्या सुधारणेबाबत कोणतेही अभिप्राय प्राप्त झाले नाही, त्यानुसार सदरील बैठकीचे इतिवृत्त मंजुर करण्यात आले.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
मुंबई, महाराष्ट्र राज्य

<u>विषय क्रमांक २</u> : <u>प्राधिकरणाच्या दिनांक १८/१२/२०२४ व २०/०१/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार कार्यवाही अहवाल (Action Taken Report) बैठकीपुढे ठेवणे.</u>

प्राधिकरणाच्या दिनांक १८/१२/२०२४ व २०/०१/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी प्राधिकरणास सादर केला. सदरील अहवालाचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.

तसेच प्राधिकरणाच्या दिनांक २०/०१/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ४ व ५ मध्ये प्राधिकरणाने पारीत केलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने संबंधित अधिकारी / कर्मचारी डॉ. मंगेश निकम व श्री. सिध्देश नर यांनी सादर केलेल्या खुलाशाबाबत सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांनी प्रस्तूत प्रकरणी शहानिशा / तपासणी करुन त्यांचा स्वयंस्पष्ट अहवाल प्राधिकरणास सादर करावा, असे निर्देश देण्यात आले.

<u>विषय क्रमांक ३</u>: <u>प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे अधिनियम, २०१५ च्या तरतूदींनुसार विनियम व नियम मसुदा तयार करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या उपसमितीद्वारे सादर करण्यात आलेल्या अंतरिम अहवालाबाबत.</u>

प्राधिकरणाच्या दिनांक १८/१२/२०२४ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक १३ अन्वये प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही विभागांचे अधिनियम, २०१५ च्या तरतूदींनुसार विनियम व नियम मसुदा तयार करण्यासाठी गठित करण्यात आलेल्या उपसमितीद्वारे सादर करण्यात आलेल्या अंतरिम अहवालाचे अवलोकन करण्यात आले.

या संदर्भात सदरील मसूदा विनियम व नियम प्राधिकरणाच्या व उपसमितीच्या सर्व संबंधित सदस्यांना पाठवुन त्यांचे अभिप्राय प्राप्त करुन घेण्याचे निर्देश देण्यात आले, तसेच या संदर्भात सर्व संबंधित उपसमिती सदस्य यांच्या समवेत सविस्तर चर्चा करण्याकरिता मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी बैठक आयोजित करण्याबाबत सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांना निर्देश दिले.

<u>विषय क्रमांक ४</u> : <u>उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दिनांक २५/०३/२०२५ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशांनुसार Single Window System for NRI/PIO/OCI and International student admission या संदर्भात कार्यवाही करण्यास प्राधिकरणाच्या मान्यतेबाबत.</u>

सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या दिनांक ९/०४/२०२५ रोजीच्या प्रस्तावाचे तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सादर केलेल्या दिनांक २५/०३/२०२५ रोजीच्या पत्रासह प्राप्त बैठक इतिवृत्ताचे अवलोकन करण्यात आले.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या NRI/OCI/PIO/FN/CIWGC या संवर्गातील प्रवेशाबाबत Single Window System राबविण्याकरिता Project Management Consultant नेमणूकीला मान्यता देण्यात

आली. सदरील नेमणूकीची परिपूर्ण प्रक्रियेबाबतचा तपशील प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

Project Management Consultant यांनी या प्रकल्पाची आवश्यकता, Working Pattern, उपयोग, व्यवहार्यता याशिवाय सदरील प्रकल्पासाठी येणारा अंदाजित खर्च व याचा विद्यार्थ्यांना कशा प्रकारे उपयोग होईल, या सर्व बाबींचा मूद्देनिहाय समावेश अहवालामध्ये असणे आवश्यक आहे. याबाबत सक्षम प्राधिकारी व आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी तसा अहवाल प्राप्त करुन प्राधिकरणास सादर करावा.

याशिवाय याबाबतच्या RFP चा मसूदा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी मा. अध्यक्ष यांना सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वरील सर्व बाबींची पूर्तता करुन या संदर्भातील निर्णय प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत घेण्यात येईल.

**विषय क्रमांक ५ : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील तंत्र शिक्षण विभागा अंतर्गत व्यावसायिक पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील तंत्र शिक्षण विभागा अंतर्गत व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी अधिष्ठाता / प्राचार्य यांनी सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावांचे अवलोकन करण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश सर्व संचालनालयांनी प्राधिकरणाकडील संगणक प्रणालीचा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने प्रवेश पडताळणी प्रक्रिया पुर्ण करण्याबाबत प्राधिकरणाच्या दिनांक ३१/१०/२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील SEBC/OBC/EWS प्रवर्गातील प्रवेशांची संचालनालय स्तरावर पडताळणी करताना दिनांक २४/०१/२०२५ रोजीचे शासनपत्र व दिनांक २२/०७/२०२४, दिनांक ०५/०९/२०२४ व दिनांक ०७/०१/२०२५ रोजींच्या शासन निर्णयांची अंमलबजावणी करुन पडताळणी करण्याबाबत दिनांक ०४/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम २०१५ मधील तरतूदींनुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अखत्यारितीतील महाविद्यालय/अभ्यासक्रम निहाय सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय व संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालांचे अवलोकन करण्यात आले.

प्राप्त अहवालावर चर्चा करण्यात आली असता, डॉ. भामरे, सह संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी तंत्र शिक्षण संचालनालया अंतर्गत विभागीय कार्यालयामार्फत करण्यात आलेल्या प्रवेश पडताळणी प्रक्रियेबाबत माहिती दिली. या पडताळणी दरम्यान वरील परिच्छेदात नमूद केलेल्या बाबी काही विभागीय स्तरावर विचारात घेतल्या नसल्याची बाब नमूद केली व या प्रकरणी पुनश्च अहवाल सादर करणे आवश्यक असल्याबाबत मत व्यक्त केले. त्यामुळे संचालनालयाच्या या प्राप्त अहवालानुसार प्राधिकरणामार्फत मान्यता / अमान्यता प्रदान झाल्यास भविष्यात निर्माण होणाऱ्या गुंतागुतींची शक्यता

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
राज्य

लक्षात घेता प्राप्त अहवालांची उपरोक्त बाबींनुसार पुनश्च तपासणी करुन नव्याने अहवाल सादर करण्याबाबत सर्व संचालकांना पत्रान्वये कळविण्याचे निर्देश प्राधिकरणाने दिले.

तसेच महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियमातील कलम ९(५) मधील तरतूदीन्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी प्रवेश बंद दिनांकानंतर "प्रवेश मान्यता प्रस्ताव" सादर करण्याबाबत व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना कळविण्यात आले होते.

विषयांकित प्रकरणी सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार तंत्र शिक्षण विभागांतर्गत अभ्यासक्रमाच्या एकुण महाविद्यालयांपैकी फक्त २५% महाविद्यालयांनी अधिनियम २०१५ च्या तरतूदींनुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर केलेले असून उर्वरित ७५% महाविद्यालयांचे प्रवेश मान्यता प्रस्ताव कार्यालयास अप्राप्त आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधिल काही अभ्यासक्रमांची उशिरा झालेली प्रवेश प्रक्रिया, SEBC/OBC/EWS प्रवेशित विद्यार्थ्यांची कागदपत्रे सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत शासनाकडून वेळोवेळी देण्यात आलेले निर्देश व त्यामुळे संबंधित संचालकांकडून प्रवेश पडताळणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयांमार्फत प्रवेश मान्यता प्रस्ताव विलंबाने सादर केल्याने बऱ्याचदा विद्यार्थ्यांना विद्यापीठामध्ये पात्रतेसंबंधीच्या अडचणी उद्द्भवतात या सर्व बाबींचा विचार करुन ज्या महाविद्यालयांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यते प्रकरणी संबंधित संचालनालयाने प्रमाणित केलेले प्रवेश मान्यता प्रस्ताव अद्याप प्राधिकरणास सादर केले नाहीत, अशा महाविद्यालयांकरिता दिनांक ३०/०६/२०२५ रोजी पर्यंत प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच या शैक्षणिक वर्षाकरिता दिनांक ३०/०६/२०२५ या अंतिम दिनांकापर्यंत प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर न केल्यास, अशा महाविद्यालयांना प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यासाठी अधिनियम २०१५ च्या कलम २० अन्वये दंडात्मक कारवाईसह मुदत देण्यात येत आहे,-

| अ. क्र. | कालावधी (फक्त शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी) | दंडाचा तपशील |
|---|---|---|
| १. | दिनांक ३०/०६/२०२५ पर्यंत | दंड नाही |
| २. | दिनांक १/०७/२०२५ ते ३१/०७/ २०२५ | रुपये एक लाख |
| ३. | दिनांक १/०८/२०२५ ते ३१/०८/ २०२५ | रुपये तीन लाख |
| ४. | दिनांक १/०९/२०२५ ते ३०/०९/२०२५ | रुपये पाच लाख |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

<u>दिनांक ३०/०९/२०२५ रोजी नंतर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील कोणत्याही व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेश मान्यते प्रकरणी महाविद्यालयांमार्फत "प्रवेश मान्यता प्रस्ताव" स्विकारला जाणार नाही.</u> याची गंभीर दखल महाविद्यालयांनी घ्यावी, असे निर्देश देण्यात आले.

६५७



शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांचे प्रवेश मान्यता प्रस्ताव सादर करण्यासाठी वरीलप्रमाणे वेळापत्रक निश्चित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने, संबंधित संचालकांनी त्यांच्या अखत्यारितील महाविद्यालयांचे प्रवेश तपासून त्याचा पडताळणी अहवाल संबंधित महाविद्यालयांना प्राप्त करुन दयावा, जेणेकरुन संबंधित महाविद्यालये वरील वेळापत्रकानुसार प्रवेश मान्यता प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर करु शकतील.

याशिवाय सदरील बाब सर्व संचालकांना त्यांचे मार्फत महाविद्यालयांची पडताळणी विहित वेळेत पूर्ण करण्याबाबत कळविण्याचे निर्देश दिले. सदस्य सचिव, प्रवेश नियामाक प्राधिकरण, मुंबई यांनी या प्रकरणी आवश्यक कार्यवाही त्वरीत करावी.

<u>विषय क्रमांक ६</u> : <u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲण्ड रिसर्च, पुणे EN६८२२ या महाविद्यालयातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचा रद्द केलेला प्रवेश पुनर्स्थापित करणेबाबत (कु. शिवेंद्र जाधव, EN२४३१९०६१).</u>

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲण्ड रिसर्च, पुणे येथील प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. शिवेंद्र जाधव यांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक २०/०१/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयास अनुसरुन महाविद्यालयाने खालीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे.

> "कु. जाधव शिवेंद्र मिलिंद (EN२४३१९०६१) यांना ८ सप्टेंबर २०२४ रोजी पिंपरी चिंचवड कॉलेज इंजिनीयरिंग अँन्ड रीसर्च मध्ये प्रवेश घेतला होता (तृतीय फेरीच्या प्रक्रियेचा दुसरा दिवस). त्याचा प्रवेश confirm करताना त्याला त्याच्या CET लॉगिनद्वारे त्यांचे नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र अपलोड करण्याबद्दल माहिती देण्यात आली होती. त्यांच्या confirmation पत्रातही तसा उल्लेख आहे. नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र स्कॅन करून CET-Cell च्या विद्यार्थी लॉगीन मधून अपलोड करण्यासाठी निर्देशित केले होते कारण कॉलेजच्या लॉगिनद्वारे डॉक्युमेंट अपलोड करण्याची सुविधा उपलब्ध नाही. तथापि, त्याने स्वतःच्या सीईटी लॉगिनद्वारे नॉन-क्रिमी लेयर प्रमाणपत्र अपलोड करणे अपेक्षित होते, पंरतू ते त्याच्याकडून राहिले, परिणामी त्याचा प्रवेश सीईटी सेलने रद्द केला. आपला प्रवेश अबाधित आहे या समजुतीने तो नियमितपणे कॉलेजमध्ये लेक्चर्स करत होता. सीईटी सेलकडून ॲडमिशन रद्द झाल्याचा मेसेज त्याच्याकडून पाहिला गेला नाही.
>
> कु. जाधव शिवेंद्र मिलिंद यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, अशी महाविद्यालयाची इच्छा असुन महाविद्यालयात ENTC या शाखेत एक जागा रिक्त आहे त्यामुळे नियमानुसार शक्य असल्यास, कृपया श्री. जाधव शिवेंद्र मिलिंद यांचे प्रवेश नियमित ठेवण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत महाविद्यालयाने विनंती केली आहे. "

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

महाविद्यालयाने सादर केलेल्या खुलाश्याच्या अनुषंगाने, सीईटी कक्षाकडून खालीलप्रमाणे अभिप्राय प्राप्त झाले आहेत,-

१) उमेदवाराने विहीत मुदतीमध्ये NCL प्रमाणपत्र ऑनलाईन अपलोड तसेच पडताळणी करुन संस्थेत जमा करणे आवश्यक होते. उमेदवाराने NCL ऑनलाईन अपलोड न करता संस्थेत जमा केल्याचे दिसून येते परिणामी सदर उमेदवाराचा प्रवेश संगणक प्रणालीद्वारे रद्द झाला.
२) सदर रिक्त जागा संस्थेने ACAP प्रक्रियेद्वारे दुस-या उमेदवारास दिल्याचे दिसून येते.
३) सद्यस्थितीत प्रवेश प्रक्रियेच्या अंतिम दिनांकानंतर विभागीय कार्यालय, पुणे यांच्या पडताळणी अहवालानुसार १ जागा रिक्त झाल्याचे दिसून येते.
४) या प्रकरणी उमेदवार व संस्था या दोघांकडूनही त्रुटी राहून गेल्याचे दिसून येत असून सदर प्रकरणी प्राधिकरण स्तरावर योग्य तो निर्णय घेण्यात यावा असे वाटते.

कु. शिवेंद्र जाधव या विद्यार्थ्याने दिनांक १७/१२/२०२४ रोजीच्या पत्रात त्याने त्याचे NCL प्रमाणपत्र दिनांक ८/०९/२०२४ रोजी महाविद्यालयात मुळ प्रमाणपत्रासह सादर केल्याचे नमूद केले आहे. NCL प्रमाणपत्र महाविद्यालयात विहित मुदतीत सादर केल्यामुळे सीईटी कक्षाकडून प्रवेश रद्दबाबतचा System generated massge दूर्लक्षित झाल्याचे पत्रात नमूद केले आहे.

वरील बाबी विचारात घेता, पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲण्ड रिसर्च, पुणे या महाविद्यालयाचा खुलासा व त्यावर प्राप्त सीईटी कक्षाचा अभिप्राय या सर्व बाबींचा सखोल विचार करण्यात आला. विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित लक्षात घेता कु. शिवेंद्र जाधव (EN२४३१९०६१) याच्या प्रथम वर्ष ENTC अभियांत्रिकी या अभ्यासक्रमातील प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

परंतू प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून निष्काळजीपणा झाल्याचे दिसून येत आहे. या कारणास्तव संबंधित महाविद्यालयास रुपये एक लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB०००३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**विषय क्रमांक ७ : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज, पुणे DSE६१७७ या महाविद्यालयातील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचा जात वैधता प्रमाणपत्राअभावी पोर्टलवर रद्द केलेला प्रवेश नियमित करणेबाबत. (कु. संस्कार राजकुमार साठे)**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे या महाविद्यालयातील थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. संस्कार राजकुमार साठे या विद्यार्थ्याने विहीत कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र ऑनलाईन पोर्टलवर सादर न केल्यामुळे त्याचा प्रवेश पोर्टलवर रद्द झाल्यामुळे सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे यांनी दिनांक २४/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सीईटी कार्यालयास कु.संस्कार राजकुमार साठे या विद्यार्थ्याचा प्रवेश Restore करण्याबाबत सीईटी कार्यालयास विनंती केली होती. सदर प्रकरणी कु. संस्कार साठे यांच्या प्रवेश नियमित करण्यसाठी शासनास केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने, शासनाच्या दिनांक १४/११/२०२४ रोजीचे संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांनी दिनांक २०/१२/२०२४ रोजीच्या पत्राने अग्रेषित करण्यात आले. प्रस्तूत प्रकरणी सीईटी कक्षाचे अभिप्राय खालीलप्रमाणे आहेत.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

१) उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र विहीत मुदतीमध्ये सादर न केल्यामुळे त्याचा प्रवेश संगणक प्रणालीद्वारे रद्द झालेला असून (Auto Cancel) याबाबत उमेदवारास SMS द्वारे कळविण्यात आलेले आहे.
२) संबंधीत संस्थेच्या लॉगीनमध्ये Auto Cancel झालेल्या उमेदवारांचा Report उपलब्ध असून संस्थेने सुद्धा उमेदवारास याबाबत अवगत करणे आवश्यक आहे.
३) सद्यस्थितीत संस्थेमध्ये सदर अभ्यासक्रमास ०३ जागा रिक्त आहेत.
४) उमेदवारास CAP फेरी ०२ मध्ये GSC प्रवर्गातून जागा वाटप झालेले आहे.

उक्त प्रकरणी महाविद्यालयाकडून दिनांक २७/०३/२०२५ रोजीच्या इमेलद्वारे मागविण्यात आलेला खुलास महाविद्यालयाने दिनांक १/०४/२०२५ रोजीच्या ईमेलद्वारे खालीलप्रमाणे सादर केलेला आहे.

Mr. Sanskar Rajkumar Sathe, had secured his admission at Sinhgad College of Engineering, Pune in Direct Second year of Civil Engineering for the academic year 2024-25, He has not submitted his caste validity certificate within the stipulated time. The College has requested to CET Cell by email dated 12.09.2024 and 24.09.2024 to consider his case on humanitarian ground. His admission was auto cancelled due to not submission of caste validity certificate within the stipulated time.

कु. साठे संस्कार या विद्यार्थ्याकडे दिनांक २९/०८/२०२४ रोजीचे जात वैधता प्रमाणपत्र आहे. महाविद्यालयाने दिनांक २४/०९/२०२४ रोजीच्या पत्रात सदर विद्यार्थ्याकडून जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचे राहून गेल्याचे नमूद केले आहे.

उक्त नमूद बाबी तसेच प्रवेशित विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित विचारात घेता, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील सिंहगड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे येथील थेट द्वितीय वर्ष स्थापत्य अभियांत्रिकी अभ्यासक्रमात कु. संस्कार राजकुमार साठे याच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

परंतू प्रस्तूत प्रकरणी कु. संस्कार साठे या विद्यार्थ्याचा प्रवेश केल्यानंतर त्याच्या जवळील जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन संगणक प्रणाली मध्ये अपलोड केले नाही. याबाबत महाविद्यालयाकडून निष्काळजीपणा झाल्याचे दिसून येते. या निष्काळजीपणाबाबत संबंधित महाविद्यालयास रुपये एक लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB०००३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक ८ : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये इंद्रायणी महाविद्यालय, पुणे या महाविद्यालयातील बी.सी.ए. अभ्यासक्रमास प्रवेशित कु. श्रावणी बबण रनवरे या विद्यार्थिनीच्या प्रवेश मान्यतेबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे या महाविद्यालयात F.Y. B.C.A. या अभ्यासक्रमात अनुसूचित जाती (SC) या प्रवर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनी कु. श्रावणी बबन रणवरे यांचे जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्यामुळे सदर विद्यार्थीनीचा प्रवेश संचालक, तंत्रशिक्षण यांनी त्यांच्या तपासणी अहवालात प्रवेश मान्यतेस शिफारस केलेली नाही.

सद्यस्थितीत विद्यार्थीनीकडे दिनांक १५/०१/२०२५ रोजीचे जात वैधता प्रमाणपत्र असून ते त्यांनी महाविद्यालयास सादर केलेले आहे. सदर जात वैधता प्रमाणपत्र प्रवेश बंद दिनांकानंतरचे (प्रवेश बंद दिनांक २८/१०/२०२४) असल्याची बाब स्पष्ट आहे.

महाविद्यालयाने सादर केलेल्या प्रवेश मान्यता प्रस्तावानुसार, महाविद्यालयात F.Y. B.C.A या अभ्यासक्रमात एकुण ६० प्रवेश क्षमतेपैंकी ४३ विद्यार्थी प्रवेशित असून प्रवेशाच्या १७ जागा रिक्त आहेत. महाविद्यालयाने दिनांक २२/०१/२०२५ रोजीच्या पत्राने कु. श्रावणी रणवरे यांचे जात वैधता प्रमाणपत्र सादर केले असुन त्यांचा प्रवेश नियमित करण्याची विनंती केली आहे.

वरील बाबींचा विचार करता व कु. श्रावणी यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे या महाविद्यालयात F.Y. B.C.A. या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थीनी कु. श्रावणी बबन रणवरे यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विद्यार्थीनीची जात वैधता प्रमाणपत्र विहित कालावधीमध्ये उपलब्ध नसताना सुध्दा महाविद्यालयाने कु. श्रावणी यांना प्रवेश दिला, ही बाब गंभीर स्वरुपाची असून या संदर्भात महाविद्यालयाने त्यांचा स्वयंस्पष्ट खुलासा त्वरीत सादर करावा.

**विषय क्रमांक ९ : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर EN६०२८ या महाविद्यालयातील ०२ विद्यार्थ्यांचे प्रवेश EWS संवर्गामधून पुर्ववत होण्याबाबत.**

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर EN६०२८ या महाविद्यालयातील EWS संवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश EWS प्रवर्गात नियमित होणेबाबत दिनांक १२/०२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये महाविद्यालयोन विनंती केली. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमासाठी १) EN२४१४७१२३ - भोसले आदित्य अतुल २) EN२४२६८४६१ - नलवडे समृद्धी सतीश या दोन विद्यार्थ्यांनी "EWS" संवर्गातील "CAP" प्रवेश प्रक्रियेमधून प्रवेश घेतला होता. परंतू या विद्यार्थ्यांनी EWS प्रमाणपत्र Annexure - A प्रपत्रात विहीत मुदतीत सादर न केल्याने सदरचे प्रवेश महाविद्यालयाने ACAP या प्रवर्गात निश्चित केले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमासाठी १) EN२४१४७१२३ - भोसले आदित्य अतुल २) EN२४२६८४६१ - नलवडे समृद्धी सतीश "EWS" संवर्गातील "CAP" प्रवेश

प्रक्रियेमधून प्रवेश घेतला होता. परंतू, या विद्यार्थ्यांकडे प्रवेशावेळी महाराष्ट्र शासनाचे "EWS" प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने सदर विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द होऊन शैक्षणिक नुकसान न होणेकरिता महाविद्यालयाने या विद्यार्थ्यांना ACAP प्रवर्गातुन प्रवेश दिलेला आहे त्यामुळे या विद्यार्थ्यांना EWS प्रवर्गाची आर्थिक सवलत देय नाही. सद्यस्थितीत सदर महाविद्यालयाकडे EWS संवर्गातील जागा रिक्त आहेत.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक २४/०१/२०२५ च्या संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ४३९/ताशि-४ पत्रानुसार शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता विद्यार्थ्यांनी सादर केलेले Annexure - I नमुन्यातील EWS प्रमाणपत्र प्रवेशासाठी ग्राह्य धरण्यास मान्यता दिली आहे. महाराष्ट्र शासन निर्णयास अनुसरून वरील दोन विद्यार्थ्यांना त्यांच्याकडील Annexure - I प्रपत्रातील EWS प्रमाणपत्र ग्राह्य धरून त्यांचा EWS संवर्गातील प्रवेश पुर्ववत (ACAP मधून CAP EWS) करण्याची विनंती महाविद्यालयाने केली आहे.

तसेच, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दिनांक २४/०१/२०२५ च्या संकीर्ण-२०२४/प्र.क्र. ४३९/ताशि-४ पत्रानुसार, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत राबविण्यात आलेल्या केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) संवर्गातून प्रवेशित झालेल्या काही विद्यार्थ्यांनी विहीत नमुन्यातील EWS प्रमाणपत्रा ऐवजी केंद्र सरकारच्या नमुन्यातील (Annexure - I) EWS प्रमाणपत्र सादर केले आहे. सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन, केवळ या शैक्षणिक वर्षाकरीता एकवेळची विशेष बाब म्हणून, सदरहू विद्यार्थ्यांनी सादर केलेले केंद्र सरकारच्या नमुन्यातील EWS प्रमाणपत्र प्रवेशासाठी ग्राह्य धरण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

विषयांकित प्रकरणी विद्यार्थ्यांनी केंद्र सरकारच्या नमुन्यातील (Annexure - I) EWS प्रमाणपत्र सादर केलेले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे,-

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| अ. क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | ॲप्लिकेशन आयडी | केंद्र सरकारच्या नमुन्यातील EWS प्रमाणपत्र |
|---|---|---|---|
| १ | भोसले आदित्य अतुल | EN२४१४७१२३ | दिनांक ३१/०१/२०२५ रोजीचे Annexure I (Central format) EWS प्रमाणपत्र |
| २ | नलवडे समृद्धी सतीश | EN२४२६८४६१ | दिनांक २१/०१/२०२५ रोजीचे Annexure I (Central format) EWS प्रमाणपत्र |

प्रस्तूत प्रकरणी उक्त नमूद बाबी, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित व शासनाच्या दिनांक २४/०१/२०२५ रोजीच्या पत्रातील निर्देश विचारात घेऊन एक वेळची विशेष बाब म्हणुन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील तंत्रज्ञान अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर येथील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. भोसले आदित्य अतुल व कु. नलवडे समृद्धी सतीश या दोनही विद्यार्थ्यांना EWS प्रवर्गातून प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**<u>विषय क्रमांक १०:</u>** **<u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन पी.टी.व्ही.ए. इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, मुंबई या महाविद्यालयातील एमबीए अभ्यासक्रमास टिएफडब्ल्युएस प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या कु. अनिकेत अनिल दोडेकर या विद्यार्थ्याच्या प्रवेश मान्यतेबाबत.</u>**

पार्ले टिळक विद्यालय असोशिएशन पी.टी.व्ही.ए. इन्स्टिट्युट ऑफ मॅनेजमेंट, मुंबई येथील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम वर्ष एम.एम.एस या अभ्यासक्रमाकरीता कु. अनिकेत अनिल दोडेकर या विद्यार्थ्याने कॅप फेरी मधून टीएफडब्लूएस या प्रवर्गामधून प्रवेश घेतलेला आहे.

महाविद्यालयाने प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्र पडताळणीसाठी संचालक यांच्याकडे सादर केले असता संचालनालयाने दिनांक ३०/१२/२०२४ रोजीच्या पडताळणी अहवालामध्ये कु. अनिकेत अनिल दोडेकर या विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत "टिएफडब्लुएस प्रवेशित उमेदवाराचा उत्पन्नाचा दाखला दिनांक ०९/१२/२०२४ रोजी निर्गमित झालेला आहे" अशी त्रुटी दर्शविली आहे.

कु. अनिकेत दोडेकर यांच्या TFWS या प्रवेश प्रकरणी प्रवेशावेळी आर्थिक वर्ष २०२३-२४ साठीचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. परंतू महाविद्यालयाने त्याच्या नॉन क्रिमिलेयर प्रमाणपत्रासाठीचे वार्षिक उत्पन्न प्रमाणपत्रांच्या आधारे प्रवेश दिलेला आहे. सद्यस्थितीत विद्यार्थ्याने दिनांक ९/१२/२०२४ रोजीचे आर्थिक वर्ष २०२३-२४ चे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

उक्त नमूद बाबी तसेच विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित लक्षात घेता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील एम.बी.ए. अभ्यासक्रमास प्रवेशित कु. अनिकेत अनिल दोडेकर यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

विषयांकित प्रकरणी विद्यार्थ्याकडे उत्पन्न प्रमाणपत्र विहित कालावधीमध्ये उपलब्ध नसताना महाविद्यालयाने कु. अनिकेत यांना प्रवेश दिला ही, बाब गंभीर स्वरुपाची असून या संदर्भात महाविद्यालयाने त्यांचा स्वयंस्पष्ट खुलासा प्राधिकरणास त्वरीत सादर करावा.

**<u>विषय क्रमांक ११ :</u>** **<u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये बीबीए/बीसीए/बीएमएस/बीबीएम, एमसीए आणि एमबीए/एमएमएस या अभ्यासक्रमांच्या केंद्रिभुत व संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेमधील प्रवेशांबाबत.</u>**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील बी.बी.ए. /बी.सी.ए. / बी.एम.एस. / बी.बी.एम., एम.सी.ए. आणि एम.बी.ए. / एम.एम.एस. या अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत व संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेतील १७ विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील बी.बी.ए. /बी.सी.ए. / बी.एम.एस. या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रकरणी संचालक, तंत्र शिक्षण स्तरावर प्रवेशाची पडताळणी सुरु असून अंतिम तपासणी अहवाल लवकरच प्राधिकरणास सादर करण्यात येतील, असे संचालनालयाकडून सांगण्यात आले.

उपरोक्त नमूद बाबी व आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे अवलोकन करुन तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित विचारात घेता **प्रपत्र-अ** मधील नमूद १७ विद्यार्थ्यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता देण्याबाबत सहमती दर्शविण्यात आली. “प्रपत्र-अ” मध्ये विद्यार्थ्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या त्रुटी संदर्भात संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याकडून अहवाल प्राप्त करुन प्राधिकरणासमोर अंतिम मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

तसेच भविष्यात अशा प्रकारच्या चूका महाविद्यालयांकडून पुनश्च झाल्यास अधिनियम २०१५ कलम २० अन्वये संबंधित संस्था दंडात्मक कारवाईस पात्र ठरतील, याबाबत सर्व संस्थांना नोंद घेण्याबाबत कळवावे, असे ठरविण्यात आले.

**विषय क्रमांक १२ : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये के.डी.एम.जी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शिरपुर, धुळे येथे व्यावसायिक पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. विश्वनाथ सत्यवान माळी या विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत मा. उच्च न्यायालयाचे, संभाजीनगर खंडपीठ येथे दाखल याचिका क्र. १९०४/२०२५ मधील दिनांक १२/०२/२०२५ रोजीचे पारित आदेश.**

के.डी.एम.जी. होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शिरपुर, धुळे येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी होमिओपॅथिक अभ्यासक्रमास प्रवेशित कु. विश्वनाथ सत्यवान माळी या विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी सादर केलेल्या प्रस्तावाचे तसेच मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद मधील याचिका क्रमांक १९०४/२०२५ मधील दिनांक १२/०२/२०२५ रोजीच्या न्यायालयीन आदेशाचे अवलोकन करण्यात आले.

प्रस्तूत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक १९०४/२०२५ मधील दिनांक १२/०२/२०२५ रोजीच्या न्यायालयीन आदेशास अनुसरुन कु. विश्वनाथ सत्यवान माळी यांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित महाविद्यालयास सुनावणीची संधी देण्यात यावी. सदर प्रकरणी महाविद्यालयास प्राधिकरणा समोर सुनावणीसाठी बोलावण्यात आले होते. परंतू महाविद्यालयाने सुनावणीसाठीची तारीख देण्याबाबत दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या ईमेलद्वारे विनंती केली.

त्या अनुषंगाने, प्राधिकरणाच्या आगामी बैठकीत महाविद्यालय आणि कु. विश्वनाथ माळी यांना सुनावणीसाठी बोलाविण्याचे निर्देश देण्यात आले.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक १३ : प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील गट अ व गट ब संवर्गामध्ये प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत.**

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील गट - अ व गट - ब सवर्गातील प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देण्याबाबत सांगोपांग चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) २०१५ च्या अधिनियमान्वये कलम ७ ची पोट-कलमे (१), (२), (३) व (४) तसेच कलम ८ यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यास नेमूद दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी, प्रवेश नियामक प्राधिकरण गठीत करण्यात आले आहे.

*उक्त अधिनियमाच्या* प्रकरण तीन कलम ९ च्या तरतूदीनुसार विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेची प्रक्रिया प्राधिकरण कार्यालयाकडून करण्यात येते आणि उक्त अधिनियमाच्या कलम १० च्या तरतुदीनुसार महाराष्ट्र राज्यातील व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा घेतल्या जातात.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५-प्र.क्र.२७६/तांशि-४, दि.०४ ऑगस्ट,२०१५ अन्वये प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (CET CELL) व शुल्क नियामक प्राधिकरण यांना सोपविलेली विविध कार्ये व जबाबदारी पार पाडण्यासाठी उच्चस्तर सचिव समितीने व मंत्रिमंडळाने दिलेली मान्यता विचारात घेऊन एकूण ७५ पदे शासन निर्णयाद्वारे मान्यता देऊन निर्माण करण्यात आली आहेत. सदर निर्माण करण्यात आलेल्या पदामध्ये प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाची एकूण २२ पदे, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाची एकूण ३० पदे व शुल्क नियामक प्राधिकरण कार्यालयाची एकूण २३ पदे इतक्या पदांचा समावेश आहे.

सदर मंजूर शासन निणर्यामध्ये नमूद पदांमधील गट-अ व गट-ब संवर्गातील पदे ही समकक्ष वेतनश्रेणीतील अन्य संवर्गामध्ये कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरण्यात येतील, असे नमूद आहे. यासंदर्भात रिक्त पदे प्रतिनियुक्तीने भरणा करण्याबाबत शासनास प्रस्ताव पाठविण्यात आलेले आहेत.

याप्रकरणी गट-अ व गट-ब संवर्गातील पदे ही शासनाकडून प्रतिनियुक्तीने उपलब्ध होत नसल्याने इतर शासकीय संचालनालयामार्फत सदर पदे ही उसनवारीने भरण्यात येत आहेत.

उक्त अधिनियमातील तरतुदींनुसार कामकाज करताना उपलब्ध अधिकारी/कर्मचारी यांना काही वेळा अतिरिक्त कामाचा बोजा पडतो. या अतिरिक्त कामाचा मोबदला म्हणून मानधनाबाबत श्री. एस. आर. भोसले, माजी संचालक, लेखा व कोषागारे यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने दिनांक १५/०३/२०२१ रोजी सुधारीत दर निश्चित करण्याची शिफारस केली. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २९/०६/२०२१ रोजीच्या बैठकीत विषय क्र. २ नुसार सदर अहवालास मान्यता देण्यात आली आहे. तसेच, सदर अहवालाची अंमलबजावणी दि.२२/०८/२०१९ (प्राधिकरण अस्तित्वात आल्यापासुन) पासून करावी असे निर्देश देण्यात आले आहेत.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

त्याअनुषंगाने, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून अधिनियम, २०१५ मधील कलम ९ अन्वये प्रवेश प्रक्रियेचे कामकाज तसेच कलम १० अन्वये सामाईक प्रवेश परीक्षेचे काम आणि महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश पडताळणी करुन प्राधिकरणाची मान्यता देणे या कामकाजाकरिता प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयातील व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षातील नियमित शासकीय अधिकारी व कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी तसेच प्रतिनियुक्तीवर/उसनवारीने आलेले अधिकारी यांना १ मुळ वेतन अदा करण्यात येत आहे.

त्याचप्रमाणे, या दोन्हीं कार्यालयातील नियमित शासकीय अधिकारी व कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी तसेच प्रतिनियुक्तीवर/उसनवारीने आलेले अधिकारी यांना दिवाळी सानुग्रह अनुदानापोटी एक महिन्याचे वेतन व अतिरिक्त कामकाजाबाबत भोसले समितीने शिफारस केलेल्या दराने मानधन अदा करण्यात येत आहे.

संदर्भीय शासन निर्णयातील गट-अ व गट-ब संवर्गातील अधिकारी शासनाकडून प्रतिनियुक्तीने उपलब्ध होत नाहीत. उक्त अधिनियमातील तरतुदींनुसार कामकाज सुरळीत व विहीत कालावधीत पार पाडण्यासाठी योग्य अधिकाऱ्यांची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने अशा अधिकाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता देण्याचे प्राधिकरणासमोर प्रस्तावित करण्यात आले.

उपरोक्त प्रकरणी सखोल चर्चा करुन खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले:-

१. वरील शासन निर्णयानुसार प्रतिनियुक्तीने भरावयाच्या पदावर प्रतिनियुक्तीवर/उसनवारीने उपलब्ध झालेल्या अधिकाऱ्यांना मुळ वेतनाच्या चाळीस टक्के प्रोत्साहन भत्ता देय राहील. दर सहा महिन्यांनी या अधिकाऱ्यांचे कार्य मुल्यांकन करण्यात येईल व समाधानकारक मुल्यांकन असलेल्या अधिकाऱ्यांचा प्रोत्साहन भत्ता चालू राहील. ज्या अधिकाऱ्यांचा कार्य मुल्यांकन अहवाल समाधानकारक नसेल, अशा अधिकाऱ्यांना सदर प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

२. वर नमूद केल्यानुसार रिक्त असलेल्या पदावर अधिकारी प्रतिनियुक्तीने उपलब्ध होण्याकरिता संबंधित संचालनालयाला पत्राद्वारे कळविण्यात येऊन इच्छुक अधिकाऱ्यांकडून विनंती अर्ज प्राप्त करण्यात येतील. अशा अधिकाऱ्यांची यादी शासनाकडे प्रतिनियुक्तीचे उचित आदेश निर्गमित करण्यासाठी शिफारस करण्यात येईल.

३. प्रतिनियुक्ती/उसनवारीने उपलब्ध होणाऱ्या अधिकाऱ्यांना वरील प्रमाणे प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय असेल. या अधिकाऱ्यांना अतिरिक्त मानधन व दिवाळी सानुग्रह अनुदान देण्याबाबत प्राधिकरणासमोर वेळोवेळी निर्णयासाठी सादर करण्यात येईल.

सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी याबाबत कार्यवाही करण्योच निर्देश देण्यात आले.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक १४ : प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही कार्यालयांशी संबंधित मुंबई, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी उच्च न्यायालयातील न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी पॅनलवरील नियुक्त वकीलांच्या शुल्क वाढीबाबत.**

विषयांकित प्रकरणी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी सादर केलेल्या दिनांक १२/१२/२०२४ रोजीच्या प्रस्तावाचे अवलोकन करुन सांगोपांग चर्चा करण्यात आली.

प्राधिकरणाचे मा. सदस्य तथा कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी विद्यापीठ स्तरावर करण्यात येत असलेल्या वकीलांच्या नेमणूकीबाबतच्या प्रक्रिये संदर्भात माहिती दिली.

प्रस्तूत प्रकरणी महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तसेच इतर प्राधिकरण स्तरावर पॅनलवरील नियुक्त वकिलांच्या शुल्काबाबत माहिती प्राप्त करुन त्यांचा अभ्यास करुन परिपूर्ण प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्याचे निर्देश देण्यात आले व तद्नंतर याबाबत रुपरेषा निश्चित करण्यात येईल, असे ठरविण्यात आले.

**विषय क्रमांक १५ : मान. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

निरंक

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से.(से.नि.))
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य.

दिनांक :